# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/11/2022 (गुरूवार)

### खूनाचा प्रयत्न

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत ०३ कि. मी अंतरावरील वार्ड नं. ०४, टाकळघाट, ता. हिंगणा येथे दिनांक ०२/११/२०२२ चे १८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. वैशाली सुभाषराव कोकुडे, वय ३७ वर्षे रा. वार्ड क्र.५, डोमाजी देवस्थान जवळ, कोष्टीपुरा, हिंगणा ता. सेलु जि. वर्धा टाकळघाट ही तिची बहीण नामे–सोनु व तिच्या मुलाबाळांसह दिवाळी सणाकरीता माहेरी आई वडीलाकडे टाकळघाट येथे आली होती. फिर्यादी व तिची बहीण सोनु व तिची आई गप्पागोष्टी करीत स्वयंपाक खोलीत बसले असतांना फिर्यादीचे वडील आरोपी नामे–शिवशंकर गंगाराम निकुरे हे दारू पिण्याच्या सवयीचे असुन नेहमी प्रमाणे पैशाचे कारणावरून फिर्यादीची आजी नामे–सौ. अनुसया गंगाराम निकुरे हिला दारूसाठी पैसे मागीतले असता, आजीने पैसे न देण्याचे कारणावरून, तिचा जिव घेण्याचे ईरादयाने, आरोपीने बाजुस असलेली लाकडी दांडयाच्या कु–हाडीने आजीच्या मानेवर मारून गंभीर जखमी करून तिला जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न केल्याने तिचा सध्या मेडीकल कॉलेज व हॉस्पीटल, नागपुर येथे उपचार सुरू आहे. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून सदर गुन्हा नोंद करून तपासात घेतला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी करीत आहे.

### अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद
### स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक ०३/११/२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रामटेक उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना मुख्यबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे पारशिवनी हद्दीतील माऊली शिवारातील पेंच नदीच्या पात्रातून अवैधरीत्या विनापरवाना रेती (गौणखनिज) ची ट्रॅक्टर ट्रॉली व्दारे माऊली ते नयाकुंड मार्गाने चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून  मौजा नयाकुंड फाटा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पारशिवनी पोलिस स्टाफ च्या मदतीने यातील विना क्रमांकाचे महिंद्रा कंपनीचे ट्रॅक्टर चालक आरोपी नामे–१) विक्की अनिल परमानंद गिरी, वय २५ वर्ष, ता. पारशिवनी २) मालक आरोपी नामे–हर्षल कंभाले, दोन्ही रा. पटगोवारी, ह.मु. पारशिवनी हे ट्रॅक्टरचे ट्रॉलीमध्ये पेंच नदीचे पात्रातुन अवैधरीत्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने त्यांच्या ताब्यातून विना क्रमांकाचे महिंद्रा कंपनीचे ट्रॅक्टर ट्रॉली किंमती अंदाजे ६,०००००/– रू, एक लाल रंगाची विना क्रमांकाची ट्रॉली किंमती अंदाजे ५,०००००/– रू . असुन ट्रॉलीमध्ये एक ब्रास रेती किमती अंदाजे ३०००/– रू असा एकुण ६,५३०००/– रूपयाचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सदर प्रकरणी पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९, १०९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीचा शोध घेणे सुरू आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणिकर यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक राजीच कर्मलवार, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, पोलीस हवालदार राजेंद्र रेवतकर, पोलीस नाईक विपीन गायधने, पोलीस नाईक अमोल वाघ, चालक पोहवा अमोल कुथे यांचे पथकाने पार पाडली.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

३) पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावर सिहोरा येथे दिनांक ०२/११/२०२२ चे ०१.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन कन्हान येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, सिहोरा गावात असलेल्या कन्हान नदीच्या पात्रात अवैधरित्या ट्रॅक्टरच्या साहायाने अवैधरीत्या रेतीची चोरी होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीस स्टेशन कन्हान येथील स्टाफने घटनास्थळी जावुन ट्रॅक्टर ट्राली क्र एमएच— ४०/ एल— ४३५१ किंमती अंदाजे ५,०००००/— रू, किंमती अंदाजे ४,०००००/— रू . असुन ट्रॉलीमध्ये एक ब्रास रेती किमती अंदाजे ५०००/— रू असा एकुण ०९,०५,०००/— रूपयाचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी कन्हान पोलीसांनी, पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९, १०९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन ट्रॅक्टर ट्रॉली चालक आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कन्हान करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**